# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०२/२०२५ (बुधवार) संध्याकाळ**

---

## अवैधरीत्या गांजा (मादक पदार्थ) बाळगणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर गामीण यांची कारवाई

दिनांक ११/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन त्यांना गोपनिय माहीती मिळाली की पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत नांदेरा शिवार येथे अवैधरित्या शेतामध्ये गांजा लागवड केली आहे. मिळोलल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी पोहचले असता तेथे १.शेख इद्रीस उर्फ सोनु शेख युनुस वय ३६ रा वर्धा रोड टिचर कॉलनी,२.आसिफ अलि सैयद वय ४४,३.शेख जावेद शेख बब्बु ,वय ३४ दोन्ही रा शनिचरा पेठ कोंढाळी असे मिळुन आल्याने घटनास्थळाची आणि आरोपीतांची पंचासमक्ष झडती घेतली असता **आरोपीच्या क्र १ याचे ताब्यातुन १) लहान मोठे आकाराचे ७ नग गुंगीकारक वनस्पती गांजाची झाडे मुळासह वजन ०१ किलो ३००ग्रॅम असुन निव्वळ गांजाचे झाडाचे वजन ०१ किलो १८ ग्रॅम किं. १०,०००/—रूपये ,२) सॅमसंग कपंनीचा गॅलेक्सी फोल्ड ५ मोबाईल किं. ५०,०००/—रूपये, ३) जिवो भारत कपंनीचा काळया रंगाचा फोन कि. १०००/—रूपये ४) आरोपी क्र २ याचे ताब्यातुन १ प्लस मोबाईल १०,०००/—रूपये ५) आरोपी क्र ३ याचे ताब्यातुन ओपो कपंनीचा मोबाईल १०,०००/—रू एकुण रूपये असा एकुण ८१,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** कलम ८(बी),२०(बी),(२),२९ एन डी पी एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या उपक्रमा अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत तीन नविन कायदयांबाबत जनजागृती कार्यशाळा

**पोलीस स्टेशन भिवापुर** :– मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामिण जिल्हा यांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या उपक्रमा अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर येथे तीन मुख्य नविन कायदे **०१) भारतीय न्याय संहीता–२०२३ , ०२) भारतीय नागरीक सुरक्षा संहीता–२०२३, ०३) भारतीय साक्ष अधिनियम २०२३** बाबत जनजागृती संबधनाने आज दिनांक १२/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा ते १३:०० वाजे पर्यंत तहसील कार्यालय येथील हॉल मध्ये कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेत तहसीलदार कल्याणकुमार डहाट ,भिवापुर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री निर्मल, पोउपनि सुरेखा बिडकर,पोउपनि महाकाल यांनी तीन नवीन कायद्याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेला भिवापूर गावातील ज्येष्ठ नागरिक, अंगणवाडी सेविका, अशा वर्कर, बचत गट महिला ,पोलीस पाटील,तहसील कार्यलयातील कर्माचारी हजर होते






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर